




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष २ रे | अंक : ६५१. वा | रविवार | दि. १४ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# खामगाव-जालना रेल्वेमार्गासाठी राज्य सरकार ५० टक्के हिस्सा देणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**जनसंचलन/ चिखली**

आमचे सरकार हे सर्वसामान्य माणसाचे सरकार असून त्यांच्या मागण्या पूर्ण करणे हे आमचे कर्तव्य आहे. असे सांगतच खामगाव - जालना रेल्वे मार्गासाठी लागणाऱ्या खर्चाचा ५० टक्के हिस्सा महाराष्ट्र सरकार देणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी चिखली येथे केली. शिवसेनेच्या वतीने मिशन ४८ शिवसंकल्प कार्यकर्ता मेळाव्याचे १३ जानेवारी चिखली येथे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे प्रमुख मार्गदर्शक होते. यावेळी मंचावर शिवसेना नेते खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय शिरसाट, आमदार चंद्रकांत पाटील, आ. डॉक्टर संजय रायमुलकर, आ. संजय गायकवाड, माजी आ. शशिकांत खेडेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख बळीराम मापारी शांताराम दाणे, ओमसिंग राजपूत, महिला जिल्हाप्रमुख आशाताई झोरे, युवासेना लोकसभा बुलढाणा क्षेत्र प्रमुख ऋषी जाधव, शिवाजी देशमुख, गजानन मोरे तसेच शिवसेना, युवासेनाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कार्यकर्ता मेळाव्याची गर्दी पाहून येणाऱ्या निवडणुकीत महायुतीच्या सभा विरोधकांचे पानिपत करेल हा झंझावात अंतिम विजय मिळेपर्यंत कायम ठेवण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. आपण केलेल्या उठावानंतर शिवसेनेचे नाव, पक्ष, चिन्ह, आपल्यालाच मिळेल असा विश्वास आपण सहकाऱ्यांना दिला होता. ते सर्व आता खरे ठरले आहे. कारण लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते. म्हणून निवडणूक आयोगाने व अध्यक्षांनी आपल्या बाजूने निर्णय दिला. आपल्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची माहिती देताना आपण शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. एक रुपयात पिकविमा असेल, केंद्र सरकार पाठोपाठ राज्य सरकारचीही ६ हजार रुपये मदत, महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत, लेक लाडकी लखपती योजना असेल महिला बचत गटासाठीची रक्कम पंधरा लाखावरुन ३० लाख करणे, राज्यभरात महिला बचत गटांना शासकीय जागेवर गाळे देण्याची भूमिका असेल असे लोकाभिमुख निर्णय आपण घेत आहोत, शासन आपल्या दारीच्या माध्यमातून २ कोटी २० लाख



लोकांना एका छताखाली लाभ मिळाला असेही ते म्हणाले. काही दिवसातच नारीशक्ती आणि वयश्री योजना लागू करण्याचे आश्वासन सुद्धा त्यांनी यावेळी दिले. आपल्या राजकीय विरोधकांवर टीकास्त्र सोडतांना उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. शिवसेनेमध्ये तुमचे काय योगदान आहे. आम्ही, प्रतापरावांनी रक्ताचे पाणी केले. लाठ्या-काठ्या खाल्ल्या, पोलीस केसेस अंगावर घेतल्या, घरावर तुळशीपत्र ठेवले. तुम्ही तर आयत्या बिळावर नागोबा झालात. आयत्या पिठावर रेगुट्या ओढला. सहकारी आमदारांचे खच्चीकरण होताना उघड्या डोळ्यांनी तुम्ही पाहत होतात. म्हणून आम्ही धाडस करून सरकार पलटवून टाकले आणि शिवसेना-भाजपा महायुतीचे सरकार बनवले. आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये खासदार प्रतापराव जाधव यांनी शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे सोबत आपण का उठाव केला याचे कारण कार्यकत्यांसमोर मांडले, जनतेने भाजप- सेनेला दिलेली सत्ता स्वतःच्या मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे यांनी काँग्रेससोबत आघाडी केली. अशी टीका करीत मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी होत असलेल्या वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पामध्ये सुधारणा करीत वैनगंगा ले पैनगंगा असा सुधारित प्रकल्पाला मान्यता द्यावी, यामुळे बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा आदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेती जमिनीला त्याचा लाम होणार आहे. तसेच खामगाव जालना रेल्वेमार्गाची सुरुवात आपल्या कार्यकाळात व्हावी अशी अपेक्षा सुद्धा त्यांनी त्यावेळी व्यक्त केली नारीशक्ती योजना त्यामध्ये दहा महिलांच्या नवीन बचतगटाला प्रत्येकी ३० हजार रुपये मिळेल तसेच वयत्री योजना ज्यामध्ये साठ वर्षाच्या




वरील व्यक्तीला वर्षातून एकदा तीस हजार रुपये मिळेल अशा या दोन्ही योजना लागू करण्याची मागणी त्यांनी नामदार शिंदे यांच्याकडे केली, बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी जोशपूर्ण भाषण केले. आपल्या मतदारसंघात सरकारच्या माध्यमातून होत असलेल्या हजारो कोटी विकास कामांची त्यांनी यावेळी माहिती दिली माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर यांनी मातृतीर्थ सिंदखेड राजा मतदारसंघाच्या विकासासाठी आपण खासदार प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वात एकनाथ शिंदे साहेबांसोबत जाण्याचा निर्णय घेतला, विविध विकास कामांसाठी मुख्यमंत्री शिंदे साहेब रस्त्यावर भेटतात आणि प्रकल्पाच्या फाईलवर सही करून प्रकल्प मार्गी लावतात. अशा रात्रंदिवस काम करणाऱ्या माणसासोबत मतदार संघाचा पर्यायाने महाराष्ट्राचा विकास होईल असे ते म्हणाले मेहकरचे आमदार संजय रायमुलकर यांनी यापूर्वीचे मुख्यमंत्री साधी भेट देत नव्हते. आपल्याला मुख्यमंत्री निवासस्थानावरून बाहेर काढण्याचा प्रसंग सांगताना त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. आम्ही गद्दार नसून उद्धव ठाकरेच गद्दार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश धुंदळे यांनी केले. मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांना ऋषीभाऊ जाधव व युवा सेना पदाधिकाऱ्यांनी विदर्भाची पंढरी असलेल्या शेगाव निवासी श्री संत गजानन महाराजांची चांदीची मूर्ती भेट दिली. कार्यकर्ता शिबिरासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांची बैठक व्यवस्था अपुरी पडल्यामुळे अनेक कार्यकर्ते समास्थळाच्या बाहेर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बाप्पा आता तर चोरट्यांनी तर हद्दचं केली जिल्हाधिकारी कार्यालय हि नाही सोडलं...

## चक्क जिल्हाधिकारी कार्यालयातील हजारो किंमतीच्या बॅटऱ्या केल्या लंपास...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालय हे आता चोरट्यांसाठी काही नवीन नाही.आता तर त्यांनी हद्दचं केली म्हणावी लागेल चक्क जिल्हाधिकारी कार्यालयात कडक बंदोबस्त पोलिस तैनात असतांना सुध्दा चोरट्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील बॅट-या चोरुन नेल्याची धक्कादायक घटना दि १३ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे. सविस्तर वृत्त असे कि,सायंकाळी चार वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयातील नेटवर्क इंजिनिअर कार्यालय हे निवडणुकीच्या कामासाठी राष्ट्रीय सुचना कार्यालय आहे.या कार्यालयाचा दरवाजाचे गेटचे कुलुप तुटलेले दिसुन आले.आता जाऊन बघितले असता कार्यालयात लावलेले यु.पी.एसच्या बॅटरी बॅकपसाठी ओकाया कंपनीच्या १९ बॅट-या पैकी १२ बॅट-या अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या आहे.१२ बॅट-या प्रत्येकी ७१०० प्रमाणे ८५ हजार २०० रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे काही दिवसापुर्वीचं जिल्हाधिकारी कार्यालयातील चंदनाचे झाड चोरुन नेल्याची घटना समोर आली होती. चंदनाच्या झाडाला चंदन आता परत हजारो रूपयांच्या बॅटयाला सुध्दा चंदन लागले आहे.नेहमी पोलिसांची वर्दळ व मुख्य




दरवाज्यावर आपले कर्तव्य बजावणा-या पोलिस कर्मचारी तैनात असताना सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयातुन बॅट-या चोरी गेल्या आहे.

# शेडनेट शेती शेतकऱ्यांच्या फायद्याची- सीताबाई मोहिते

## कृषी प्रदर्शनात प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

गावातील युवक कामासाठी शहरांकडे जात आहेत. तरुणाईला गावातच थांबवून त्यांच्या हाताला काम देण्याची गरज आहे. येणाऱ्या काळात आभाळाखालची शेती केल्यापेक्षा शेतकऱ्यांनी ग्रीन हाऊस, पॉली हाऊस, शेडनेट शेती केली पाहिजे, असे आवाहन जालना जिल्ह्यातील प्रगतीशील महिला शेतकरी सीताबाई मोहिते यांनी केले. अभिता ॲग्रो एक्स्पो राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात १३ जानेवारी रोजी अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके, दिशा बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्ष जयश्रीताई शेळके यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सीताबाई मोहिते बोलत होत्या. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, शेतकऱ्यांनी शेती परवडत नाही असे म्हणू नये. पारंपरिक शेती करण्याऐवजी वेगळ्या पद्धतीने शेती करावी. शेतीत नवनवीन प्रयोग करावे. उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावे. आपल्या मालाचे भाव आपण ठरवले पाहिजेत. आपल्याला मार्केटिंग यायला हवे. पुणे, मुंबईत भरलेल्या कृषी प्रदर्शनाला आपण जाऊ शकत नाही. अभिता कंपनी आणि राज्य शासनाचा कृषी विभाग यांनी सिंदखेड राजा येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आयोजित केले




आहे. प्रत्येक शेतकऱ्याने कुटुंबासह या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील कृतिका गांगडे आणि प्रविण गीते यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी त्र्यंबक ठाकरे, उल्हास भुसारी, आकाश मेहेत्रे, शाहीर रामदास कुरंगळ, डॉ.दत्तात्रय बुरकुल, राजेश आढाव, सविता बुरकुल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन विनोद ठाकरे यांनी केले. शेतकरी सीताबाई मोहिते यांचा आवळा प्रक्रिया उद्योग आहे. आवळा ज्युस, आवळा कँडी, आवळा गुलकंद असे आवळ्याचे त्यांचे १४ प्रकारचे उत्पादने आहेत. त्या निरक्षर आहेत. मात्र नवीन गोष्टी शिकण्याची त्यांना आवड आहे. कौशल्य शिकायला वयाची अट नसते असे त्या म्हणतात. निरक्षर असतांना सुद्धा त्यांनी विदेश दौरा केला आहे. त्यांना आतापर्यंत शासनाचे १३५ व इतर पुरस्कार मिळालेले आहेत. निरक्षर असूनही सिताबाईंनी शेतीत घेतलेली भरारी इतरांसाठी प्रेरणादायी आहे. कागदी लिंबू उत्पादक कैलास तायडे, सोयाबीन उत्पादक विठोबा उगलमुगले, कपाशी उत्पादक सर्जेराव जायभाये, नर्सरी फळबाग शेतकरी अतिष ठाकरे, मोसंबी उत्पादक शिवाजी बुधवत, आवळा उत्पादक पांडुरंग तांबेकर, शरद कायंदे, रावसाहेब कुळकुंबे, परमेश्वर आघाव, भरत नागरे, अरुण ताठे, संजय महेर, मधुकर मेहेत्रे, खंडू मेहेत्रे, अनिल बाहेकर, अरुण मेहेत्रे, प्रकाश चौधरी, विजय तायडे, त्र्यंबक मगर, राजेश ठाकरे, विशाल तांबेकर या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# १४ वर्षीय अल्पवयीन मुलगा बुलढाणा शहरातून बेपत्ता...

**जनसंचलन/ बुलढाणा**



१४ वर्षीय अल्पवयीन मुलगा घरात कोणाला काही न सांगता निघून गेला आहे. हि घटना दि ८ जानेवारी २०२४ रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास केशव नगर येथून येथे घडली आहे. अभिजित राजेश कदम वय १४ रा.केशव नगर बुलढाणा असे बेपत्ता झालेल्या मुलाचे नाव आहे. सविस्तर वृत्त असे कि,फिर्यादी यांना १ मुलगी व २ मुले आहे. अभिजित हा मधला मुलगा आहे. तो शिवाजी हायस्कुल किन्होळा येथे शिकायला होता.व चिखली येथे होस्टेलला राहत होता. त्याच्या हाताला मार लागल्यामुळे घरी आला होता.८ जानेवारी रोजी सकाळी गायरान मध्ये राहणाऱ्या किरण खिल्लारे सोबत त्याचे भांडण झाले.रात्री ९:३० वाजता घरी आला व घरात कोणाला काही न सांगता निघून गेला.आणि परत वापस आलाचं नाही.मित्र मंडळी तसेच नातेवाईक मंडळी सर्व ठिकाणी शोध घेतला मात्र तो काही मिळुन आला नाही.शेवटी त्यांची आई यांनी शहर पोलिस स्टेशनला मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दिली आहे. त्याचे वर्णन उंची ५ फुट ३ इंच,रंग गोरा, शरीर सडपातळ बांधा,अंगात लाल ब्लॅक शर्ट,काळ्या रंगाची पॅन्ट पांढरा बुट असे कुठे दिसुन आल्यास बुलढाणा शहर पोलिस स्टेशन कळवावे असे आव्हान पोलिसांनी केले आहे.


मराठा महिला अर्बन
को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com
तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क
सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)
मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


# जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांना शाहिरी पोवाड्यातून आझाद हिंदचे अभीवादन कर्तुत्वान जिजाऊ लेकींचा सत्कार...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजमाता जिजाऊ स्वाभिमानाने जगणाऱ्या आणि लढणाऱ्या प्रत्येकाचे प्रेरणास्थान आहे. जगाला हेवा वाटावा असेच जिजाऊंचे कर्तृत्व आणि संस्कार आहेत. जिजाऊंच्या संस्कार आणि कर्तृत्वातूनच छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य घडवीले. असे मत आझाद हिंद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीशचंद्र रोठेंनी व्यक्त केले. स्थानिक आझाद हिंदच्या संपर्क कार्यालयात १२ जानेवारीला सायंकाळी रमाई ब्रिगेड,किसान ब्रिगेड, रनरागिनी ब्रिगेड, बहुजन महिला संघटना, राणी लक्ष्मीबाई सहगल ब्रिगेड,आझाद हिंद महिला संघटना, आझाद हिंद शेतकरी संघटना यांच्या संयुक्त विद्यामानाने राजमाता जिजाऊं आणि स्वामी विवेकानंदांना शाहिरी, पोवाड्यातून अभिवादन तथा जिजाऊ लेकींच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रबोधनकार रोठेंनी उपरोक्त विचारांची सुमनांजली जिजाऊंना समर्पित केली. सामूहिक माल्यार्पण करून शाहीर सुमनताई आहेर यांनी जिजाऊ वंदनेने अभिवादनाला सुरुवात केली. राजीव गांधी मिलिटरी स्कूलचे उपप्राचार्य प्रा.शैलेश वारे यांच्या अध्यक्षतेत तर सुरेखाताई निकाळजे, पंचफुलाबाई गवई, आशाताई गायकवाड, सुमनताई राजपूत, योगिता रोठे,उमेश श्रीवास्तव कायस्थ, संजय चावला, प्रबोधनकार अँड सतीशचंद्र




रोठे यांच्या प्रमुख उपस्थित जिजाऊ शाहिरी, पोवाडा आणि कर्तुत्वान जिजाऊ लेकींच्या सत्कार समारंभाला सुरुवात करण्यात आली. जिजाऊंच्या जीवन कार्यावर उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून तर शाहिरांनी शाहिरीतून प्रकाश टाकला. यावेळी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, महिला बचत गट, जीवनावश्यक वस्तूंची घरगुती निर्मिती करणाऱ्या सत्कारमूर्ती प्रमिलाताई सुशीर, सिमा कायस्थ,मनीषाताई चिंचोले, वर्षाताई ताथरकर, जोत्सना नागरे, वनिता रोठे यासह कर्तुत्वान जिजाऊ लेकींचा सत्कार प्रमाणपत्र, साडीचोळी, स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नाट्य कलाकार शशिकांत इंगळे, प्रा.गणेश काळुसे,विजय सातव, उमेश कायस्थ,अमोल दूतोंडे, नितीन तापडिया, नितीन जयस्वाल,अस्लम शाह,श्रीकृष्ण पाटील यासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन जिजाऊ लेकींना सन्मानित केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खळबळजनक घटना बुलढाण्यात चिमुकलीचा त्याने केला विनयभंग!..

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा शहरातून खळबळजनक बातमी समोर आली आहे. अल्पवयीन ७ वर्षीय मुलीवर वाईट नजर ठेऊन उभा असलेला पापी दि १२ जानेवारी पोलिसांनी रंगेहाथ पकडला. त्याआधी २२ नोव्हेंबरला त्याच चिमुकलीचा विनयभंग केल्याचा तक्रार अर्जातून निष्पन्न झाले आहे. (३४ वर्षाचा आरोपी आहे. त्याला पोलिसांनी जेरबंद केले आहे. आरोपीला १२ जानेवारीच्या दुपारी वाईट उद्देशाने मुलीवर नजर ठेऊन घटनास्थळी आडोश्याला उभा होता. हे मुलीच्या वडिलांना समजताच त्यांनी त्याचा पाठलाग केला, त्याला पकडण्यात ते यशस्वी झाले. त्यांनतर त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले, दरम्यान त्याला पोलिसांनी जेरबंद केल्याचे वृत्त आहे. सविस्तर घटनाक्रम असा की, आरोपी हा मागील एका वर्षांपासून अल्पवयीन मुलीवर वाईट नजर ठेवून होता. २२ नोव्हेंबर २०२३ रोजी चिमुकली खेळत असताना, चिंचोले चौक कुठे आहे? माझ्या गाडीवर बस आणि दाखव असे म्हणून तिच्याशी पहिल्यांदा संवाद साधला. मात्र चिमुकलीने नकार दिला आणि तेथून घराच्या दिशेने पळत निघाली, मग रस्त्यातच आरोपीने चिमुकलीचा वाईट उद्देशाने हात पकडून विनयभंग केला.त्यानंतर तिने सगळी आपबिती कुटुंबीयांना सांगितली. मात्र त्यावेळी बदनामी पोटी त्यांनी तक्रार देण्याचे टाळले. असे असतानाच ११ जानेवारी २०२४ ला आरोपी पुन्हा दुष्कृत्य करण्याच्या हेतूने चिमुकलीच्या घराजवळ आला. चिमुकलीवर वाईट नजर ठेवून असलेल्या आरोपीला चिमुकलीने लगेचच ओळखले व आरडाओरड केली. मात्र त्यावेळी त्याने तेथून पळ काढला. इतकंसगळं घडल्यानंतर देखील आरोपी परत दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि १२ जानेवारीला दुपारी ५ वाजता वाईट नजर ठेवून उभा दिसला. मात्र यावेळी चिमुकलीच्या घरच्यांनी त्याचा पाठलाग करत त्याला पकडले. आणि पोलिसांच्या हवाली केले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेतात आरोपी विरुद्ध पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. त्याची जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे.



# राष्ट्रमाता-राजमाता माँ जिजाऊ यांना नांद्राकोळी येथे अभिवादन...

जनसंचलन/बुलढाणा



राष्ट्रमाता - राजमाता माँ जिजाऊ व सावित्री माई फुले या महामातांची संयुक्त जयंती नांद्राकोळी येथे साजरी करून अभिवादन करण्यात आले. जयंती उत्सव कार्यक्रमा प्रसंगी माँ जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज, सावित्री माई फुले यांच्या प्रतिमानां पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महामाताच्या जीवन कार्यावर मान्यवारांनी मनोगत व्यक्त केले. संपूर्ण जीवन भर जनकल्याण चे कार्य करून सर्वच समाज घटकाना प्रगती व परिवर्तनाच्या दिशेने नेऊन त्याच्या उद्धाराचे कार्य राजमाता व सावित्रीमाई फुले यांनी केल्याचे सांगत विद्रोही साहित्यिक समाधान जाधव यांनी स्वरचित कविता सादर करून गाव कन्या मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक दलित मित्र माधवराव हुडेकर यांनी समाज परिवर्तन चे कार्य करत असतांना आपल्या जीवाची पर्वा न करता असंख्य बहुजन यांना स्वतंत्र, मुक्त जीवन दान या महामाता यांनी दिल्या च्या भावना दलित मित्र माधवराव हुडेकर यांनी व्यक्त केल्या. या वेळी सर्व गणमान्य पदाधिकारी व महिला, तरुण वर्ग,मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच व विद्यमान सदस्य संजय का ळवाघे यांनी तर आभार उपसरपंच मनोज जाधव यांनी मानले

# मानवतेसाठी जातीअंताचा लढा सर्वजन लढू- सुनिल शेळके..

## सत्यशोधक च्या टीमचा सिंदखेडराजा वासीयांकडून भव्यनागरी सत्कार...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

महामानवांनी जाती निर्मूलनासाठी आपले आयुष्य वेचले. समाजाला नवी दिशा दिली.समाजसुधारकांचा विचार पुढे नेण्यासाठी जातीच्या भिंती उध्वस्त करा आणि जातीअंताचा लढा खांद्याला खांद्यालावून लढुया असे आवाहन अभिता कंपनीचे सीईओ तथा सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता सुनील शेळके यांनी केले. क्रांतीसूर्य महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक चित्रपटाच्या टीमने १२ जानेवारी रोजी सिंदखेड राजा येथे जिजाऊ जयंती उत्सवानिमित्त राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन घेतले. याप्रसंगी सिंदखेड राजवासीयांच्यावतीने सत्यशोधक चित्रपटात महात्मा फुलेंची बालपणीचे भूमिका साकारलेले प्रथमेश पांडे, सावित्रीमाईंचे बालपण साकारणारी समृद्धी सरवार, फातिमा शेख यांची भूमिका केलेली मोनिका तायडे, तुकाराम बिडकर,नीता खडसे, प्रा.संजय खडसे,कांचन वानखेडे,किरण डोंगरे,सीमा जाधव,चित्रपटाचे संकल्पक राहुल तायडे,दिग्दर्शक निलेश जळमकर,निर्माता सुनिल शेळके, सह निर्माता राहुल वानखेडे, हर्षा तायडे यांचा सन्मान करण्यात आला. प्रसंगी सुनिल शेळके बोलतांना म्हणाले सत्यशोधक चित्रपटात महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या जीवनाचे अनेक पैलू बघायला मिळतात.महात्मा फुले , सावित्रीमाई फुले यांनी मानवाच्या कल्याणासाठी शिक्षणाची गंगा अवतरवली. जातीपातीचा विचार कधीच केला नाही. प्रसंगी अवहेलना स्वीकारली.मात्र आपले कार्य थांबवले नाही.त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी जातीच्या भिंती उध्वस्त करून जातीअंताचा लढा लढण्याची गरज असल्याचे सुनिल शेळके म्हणाले. राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मस्थळी मातृतिर्थ सिंदखेड राजा नगरीत सत्कार झाल्यामुळे सत्यशोधक चित्रपटाचे कलाकार खुप भारावले होते.एवढे प्रेम मिळेल असा स्वप्नातही विचार केला नव्हता अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.सत्यशोधक चित्रपटातील भूमिकेबद्दल त्यांनी माहिती दिली.तसेच प्रत्येकाने हा चित्रपट बघावा, असे आवाहन केले. यावेळी नगरपालिका लोकनियुक्त नगराध्यक्ष सतिश तायडे, उपाध्यक्ष भिमा जाधव, बांधकाम सभापती गणेश झोरे, पाणीपुरवठा सभापती बालाजी मेहेत्रे,स्वच्छता व आरोग्य सभापती भिवसन ठाकरे, उपसभापती चंद्रकला तायडे, नगरसेवक राजेश आढाव, नंदा मेहेत्रे,आशामती मेहेत्रे,रुखमन तायडे,काझी हजरानूझहत फारुक,राजेश बोन्द्रे, शेख अजिम,ज्योती म्हस्के,सुमन खरात,बबन म्हस्के,सारिका मेहेत्रे, दिपाली म्हस्के,त्र्यंबक ठाकरे,सिंधुताई ठाकरे, देविदास ठाकरे, ॲड.नाझेर काझी,सीताराम चौधरी,विष्णू मेहेत्रे,छगनराव मेहेत्रे, शिवाजीराजे जाधव,ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ सि. राजा,स्वयंमसिध्द महिला फाऊंडेशन,सि. राजा संघर्ष समिती,महिला ओबीसी विंग, दिलीप आढाव,संदीप मेहेत्रे,शाहिर रामदास कुरंगळ,आतिश तायडे,डॉ.भिमराव म्हस्के, डॉ. दत्तात्रय बुरकुल, दिलीप चौधरी,विलास असोलकर, अनंता खेकाळे,विजय तायडे, रामदास बारावकर,नामदेव आढाव,राजेश अंभोरे,सिंधू जाधव,विद्या खरात,प्रतिभा तायडे,सुनिता खरात,मौर्य अनिता मेहेत्रे,सुशिला आढाव,प्रतिभा ठाकरे,डॉ.रजनी म्हस्के,शुभांगी मगर,अरुणा चौधरी,डॉ.किरण म्हस्के,शिवा पुरंदरे,अशोक जाधव,सतीश काळे,कैलास मेहेत्रे यांची उपस्थिती होती.




# अमडापूर येथे (उबाठा) शिवसैनिकांनी नार्वेकरांच्या निकाला विरुद्ध नोंदविला निषेध.

जनसंचलन/ चिखली

दि. ११ जानेवारी गुरुवार रोजी सकाळी १० वा.अमडापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यांसमोर (ऊबाठा) शिवसैनिकांना एकत्रित येऊन शिवसेना मूळ राजकीय पक्ष एकनाथ शिंदेचां या नार्वेकरांनी दिलेल्या निकाला विरुद्ध आक्रमक पवित्रा घेत,घोषणाबाजी देत निषेध नोंदविला. आमची उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यावर श्रद्धा असून, निषेध नोंदविण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी नरेंद्र खेडेकर यांना दूरध्वनीवरून चर्चा केली असता, खेडेकर यांनी कार्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला दिला. येत्या काळात संक्रांत ही कोणत्या पक्षावर येणार जनता त्यांना चांगलाच धडा शिकवेल तसेच तुम्ही कार्यकर्त्यांनी गर्भगळीत न होता तितक्यात जोमाने तयारी ठेवा असा संदेश नरेंद्रजी खेडेकर यांनी दिला असून, जनता ही सदैव आपल्या पाठीशी आहे असा संदेश त्यांनी दूरध्वनीवरून कार्यकर्त्यांना दिला. यावेळी प्रलय खरात, अण्णा देवकर, भीमराव देशमुख, बंडू सरसे, किशोर डहाळे, अनिल देशमुख, बंटी देशमुख, कोंडूबा केवट, सुनील भालेराव, घनश्याम जयस्वाल, अक्षय माळोदे, अनिल राऊत, संजय गायकवाड, शिवाजी गायकवाड, अनिल, समाधान जोहरे, योगेश सपकाळ असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिखली येथे स्वागत...

जनसंचलन/ चिखली



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज छत्रपती संभाजीनगर येथून चिखली (जि. बुलडाणा) येथील हेलिपॅंडवर आगमन झाले. जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित शिवसंकल्प अभियान - कार्यकर्ता मेळावासाठी ते आले असून, खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमुलकर, आमदार श्रीमती श्वेताताई महाले यांनी त्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासमवेत आमदार संजय शिरसाठ उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते, पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी त्यांचे स्वागत केले.

# जिजाऊ जन्मस्थळावर करण्यात आली हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी...

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील कन्येच्या हस्ते जिजाऊंना मानवंदना

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता जिजाऊ जन्मस्थळावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. सिंदखेडराजा तालुक्यातील पांगरखेड येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील कन्या प्रतिक्षा रामेश्वर जायभाये हिला जिजाऊंना अनोखी मानवंदना देण्याचा मान अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी दिला. स्वराज्याला दोन छत्रपती देणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ यांची १२ जानेवारी रोजी जयंती आहे. दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव राज्यभर धुमधडाक्यात साजरा केला जातो. जिजाऊंचे माहेर असलेल्या सिंदखेड राजा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त जिजाऊ राजवाडा उजळून निघतो. देशभरातून जिजाऊ भक्त अभिवादनासाठी मातृतीर्थावर येतात. अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके आणि



जयश्रीताई शेळके यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलीला हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्याची संधी दिली. शेळके कुटुंबांचा या निर्णयाची काल दिवसभर चर्चा होती. नागरिकांनी हेलिकॉप्टरसोबत सेल्फी काढण्याचा आनंद घेतला. गतवर्षी जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांची कन्या अभिता हिच्या हस्ते जिजाऊ जन्मस्थळावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली होती. मात्र यावर्षी सिंदखेडराजा तालुक्यातील पांगरखेड येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील कन्या प्रतीक्षा रामेश्वर जायभाये हिच्या हस्ते जिजाऊ जन्मस्थळावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. या २० वर्षीय कन्येला हा मान सन्मान देण्यात आल्याच्या निर्णयामुळे अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके, दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या अध्यक्षा जयश्रीताई शेळके यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. शेतकऱ्यांप्रती असलेली भावना त्यांनी निर्णयाद्वारे अधोरेखित केली आहे.

# राजमाता जिजाऊ जयंती निमित्त वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ वृद्धाश्रमात किराणा दान...

**जनसंचलन/ चिखली**




तालुक्यातील तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे राजमाता मा साहेब जिजाऊ जयंती निमित्त कालकथित भगवान साहेबराव गाडेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ विष्णू महाराज गाडेकर यांनी दहा हजार रुपये किमतीचा किराणा भेट दिला.तसेच विष्णू घुबे पाटील यांनी यांच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमात स्वच्छालय बांधकाम साठी एक ब्रास चुरी दान दिली सविस्तर असे कि समाजातील उपेक्षित, समाज दुर्लक्षित मुलं असून सुद्धा सांभाळू शकत नाही. भिक्षा मागून किंवा दारोदारी जेवण मागून पोटाची भूक भगवीणारे असे वयोवृद्ध आजी आजोबांना मायेची साथ देत राहणे जेवण औषध उपचार कपडे वर इतर सर्व सुविधा मोफत पुरवून निः स्वार्थ सेवा सुरु असलेल्या तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे राजमाता मा साहेब जिजाऊ जयंती निमित्त कै, भगवान साहेबराव गाडेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ विष्णू महाराज गाडेकर यांनी दहा हजार रुपये किमतीचा किराणा भेट दिला. यावेळी पत्रकार एकनाथ मळेकर विष्णू महाराज गाडेकर, पत्रकार भरत जोगदंडे, ऋषिकेश सोनवणे हे उपस्थित होते. विष्णू महाराज यांनी वृद्धाश्रमातील वृद्धाच्या सेवे करिता किराणा दान दिला त्याबद्दल तुकाराम आश्रय वृद्धाश्रमात चे संचालक प्रशांत डोंगरदिवे वर संचालिका सौं रुपाली डोंगरदिवे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. तसेच विष्णू महाराज यांच्या सारखे सामाजिक कार्यकर्त्यांनी वृद्धाश्रमात साठी मदत केल्यामुळे सेवाधारिंचे मनोबल वाढते त्यामुळे त्यांना निराधारांची निःस्वार्थ सेवा करण्याकरिता ताकत मिळेल असे मत पत्रकार एकनाथ मळेकर यांनी व्यक्त केले.

# मोताळ्यात भुरट्या चोरांचा वाढला आतंक...

## पोलिस प्रशासन लक्ष देणार का?

**जनसंचलन/मोताळा**



तालुक्याच्या विविध भागांमध्ये घरफोडी,दरोडा करुन मारहाण,दुचाकी चोरी,गुरे-ढोरे व विविध भागासह चारचाकी गाड्यांचेही मोठ्या प्रमाणात साहित्य चोरी जाण्याच घटनेमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाढ होत असल्याचे दिसत आहे.वाढत्या चोरांमुळे मोताळा तालुक्यासह आजुबाजुच्या परिसरात नागरिकांमध्ये चोरट्यांनी दहशत निर्माण झाली आहे.तालुक्याअंतर्गत येणाऱ्या बोराखेडी पोलिस स्टेशन व धामनगाव बढे पोलिसांनी या चोरट्यांचा त्वरीत बंदोबस्त लावून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी या भागातील नागरिकांमधून केल्या जात आहे.मागील काही दिवसांपासून बोराखेडी पोलिस स्टेशन अंतर्गत विविध भागांमध्ये दुचाकी चोरीसह दुचाकीचे महत्वाचे साहित्य,बॅटऱ्या,चारचाकी वाहनाचे साहित्य व गुरेढोरे आणी इतर गृहपयोगी साहित्याच्या अनेक चोरी घरफोडी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.मागील १५ दिवसाच्या कालावधीमध्ये संपूर्ण तालुक्यातील वातावरण भयभीत झाले आहेत.काही चारचाकी वाहनांच्या बॅटऱ्या सुद्धा चोरी गेल्याचे समजते.या सर्व छोट्या मोठ्या चोऱ्यांसह या भागात सक्रिय असलेले चोरटे घरातील ऐवज लंपास करुन मारहाण करीत आहेत.या सर्व प्रकाराबाबत या भागातील नागरिकांनी बोराखेडी ठाण्यात तक्रारी देऊनही आजपर्यंत पोलिसांनी चोरट्यांना पकडण्यासाठी पुढाकार घेतला नसल्याची खंत तालुक्यातील नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

(गुंतवणुक रक्कम →)

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958